# शरद पवार यांचे महिला सबलीकरण धोरण

- प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे

**प्रस्तावना :**

महात्मा ज्योतीराव फुले हे स्त्रीमुक्ती आंदोलनाचे जनक व स्त्री-स्वातंत्र्याचे उद्गाते होते. त्यांच्या या कार्यात त्यांची पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी मोठ्या त्यागाने व कष्टाने साथ दिली. फुले यांनी स्त्रियांसाठी शाळा उघडणे, सावित्रीबाईंना त्या शाळेत शिक्षिका नेमणे, विधवांच्या केशवपनाविरुद्ध आंदोलन करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करणे, विधवांसाठी प्रसूतिगृह उभारणे, विधवांच्या पुनर्विवाहास चालना देणे इ. उपक्रमांतून स्त्री-मुक्तीची मोठी चळवळ उभारली होती. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून शरद पवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर २२ जून १९९४ रोजी सर्वंकष महिला धोरण जाहीर करून देशात प्रथम महाराष्ट्रात महिलांना सर्व क्षेत्रांत विकासाचा नवा मार्ग मोकळा करून दिला.

**क्रांतिकारी महिला विकास धोरण :**

महात्मा फुले यांच्या स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मान्यता देऊन भारताच्या संविधानात स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरिकांचा मुलभूत हक्क मानण्यात आला आहे. असे जरी असले, तरी सर्वांगीण विकासातून स्त्री वर्ग हा बाजूलाच राहिला होता. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत स्त्रिया अपवाद वगळता उपेक्षित होत्या. स्त्री वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी व उद्धारासाठी शरद पवार यांनी केलेले कार्य समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने युग-प्रवर्तक ठरते. दि. २२ जून १९९४ रोजी त्यांनी भारतातील सर्वप्रथम समाज परिवर्तनवादी व क्रांतिकारी महिला धोरण जाहीर केले की, ज्यामुळे महाराष्ट्रातील महिलांच्या जीवनात विकासाची, कर्तृत्वाची व समान संधीची नवी पहाट उजाडली. महिला धोरण आखताना समाजातील विविध क्षेत्रांत महिला विकासासाठी काम करणाऱ्या संस्थांशी व व्यक्तींशी संपर्क साधला. त्यांच्याशी चर्चा करून महिलांच्या सर्वांगीण विकासाकडे वाटचाल करणारे धोरण त्यांनी मोठ्या अभ्यासूवृत्तीने आखले व तो स्त्री-स्वातंत्र्याचा कार्यक्रम म्हणून जाहीर केला. त्यांच्या धोरणात स्त्री-पुरुष समानता, महिलांचे सबलीकरण, सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा सक्रिय

सहभाग, बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध व त्याचे निर्मूलन, महिलांच्या आरोग्यविषयक अधिकारांना मान्यता, महिला शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविण्याची आवश्यकता या प्रमुख बाबींचा समावेश होता. अस्तित्वात असलेल्या कायद्यांची व नियमांची छाननी करून त्यामागील लिंगभेदविषयक पूर्वग्रहदुषित तरतुदी शोधून त्यात महिलांना समान न्याय मिळविण्याच्या दृष्टीने नवीन कायदे प्रस्थापित करणे हा या क्रांतिकारी व समाजपरिवर्तनवादी महिलांविषयक धोरणांचा उद्देश होता. त्यानुसार वडिलोपार्जित संपत्तीत भावाबरोबर बहीणही समान हिश्श्याची मालक झाली. महिलांविषयक खटल्याचा निकाल, त्वरित करण्याचाही निर्णय घेतला गेला. स्त्री पक्षकारांना पोटगी, मालमत्ता, हिंसा व घटस्फोट यांसारख्या खटल्यांमध्ये कोर्ट फी माफ करण्याचा निर्णय घेतला. सरकारी योजनेतून इंदिरा आवास योजनेखाली बांधण्यात येणारी घरे पति–पत्नीच्या संयुक्त नावाने देण्याचा निर्णय झाला.

**महिलांचा सामाजिक स्थर उंचावण्याचा प्रयत्न –**

या महिलांविषयक धोरणानुसार शासकीय, निमशासकीय, शासकीय अनुदानित संस्थांमध्ये नोकरभरतीसाठी महिलांना ३० % जागांचे आरक्षण ठेवले. महिला पोलिसांना पुरुष पोलिसांसारखा दर्जा देणे, महिलांना कायदाविषयक सल्ला मोफत देणे, शासकीय अतिरिक्त जमीन वाटप करताना पति–पत्नीच्या संयुक्त नावे देणे, झोपडपट्टीतील रहिवाश्यांना देण्याची शासकीय ओळखपत्रे संयुक्त नावे देणे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचा १०% भाग महिला व बालकल्याण योजनेसाठी वापरणे, महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना, देवदासींना निर्वाहासाठी अनुदान देणे, इत्यादी महिला उत्पन्नविषयक निर्णय घेऊन महिलांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी व त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी ह्या धोरणामुळे शक्य झाले.

**महिलांच्या आर्थिक गुलामगिरीतून मुक्ततेसाठी प्रयत्न –**

महिलांना आर्थिक गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी संघटित व असंघटित क्षेत्रांतील महिलांच्या समस्यांचे निराकरण करणारा बहुमुखी कार्यक्रम पवारांनी घेतला. संघटित क्षेत्रात दिवसभराची बालसंगोपन केंद्रे व पाळणाघरे स्थापन करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३% प्रतिनिधित्व देण्यात आले. पोलीस पाटलाची ३३% पदे आरक्षित करण्यात आली.

असंघटित क्षेत्रामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. गरजू व होतकरू महिलांना त्यांच्या उद्योगासाठी महामंडळाकडून अर्थसाहाय्य देण्यात येऊ लागले. स्वयंरोजगारातून पैसा मिळविण्याच्या क्षमतेत

भरीव वाढ व्हावी म्हणून कामधेनू योजना कार्यान्वित करण्यात आली. नोंदणीकृत महिला संस्थांकडून त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची शासनामार्फत खरेदी होऊ लागली. औद्योगिक वसाहतीत गाळे वाटताना महिलांना प्राधान्य, फळे, भाजी, मासळी, मटण बाजारात महिला विक्रेत्यांना गाळेवाटपात प्राधान्य देण्यात आले. गावपातळीवर अंगणवाडी कार्यक्रम हा महिला विकासाचा केंद्रबिंदू ठरला. तसेच महिला बचतगट स्थापन करण्यात आले.

**महिलांसाठी प्रौढ साक्षरता उपक्रम –**

ज्या स्त्रिया निरक्षर आहेत व ज्यांनी लवकर शाळा सोडून दिली. अशांसाठी ग्रामपातळीवर अंगणवाडी केंद्राचा वापर महिला केंद्र म्हणून केला. त्यामध्ये साक्षरतेबरोबरच आरोग्यविषयक सल्लेही दिले जाऊ लागले.

**मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन –**

शिक्षण मधूनच सोडलेल्या मुलींसाठी व अनुत्तीर्ण तसेच शिक्षणात कमकुवत असणाऱ्या मुलींसाठी विशेष शिकवणी वर्ग, मुलींची शिक्षणातील गळती थांबविण्यासाठी त्यांना उपस्थित भत्ता देण्याचाही महत्वपूर्ण निर्णय पवारांनी या महिलाविषयक धोरणानुसार घेतला.

**उच्च व तंत्र शिक्षणात मुलींना आरक्षण –**

उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी २५% जागा आरक्षित ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. तसेच या मुलींसाठी टप्प्याटप्प्याने वसतिगृहे बांधून त्यांना निरनिराळ्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झाला. इ. १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना एस.टी.पास मोफत करण्यात आला.

**महिलांचे आरोग्य –**

स्त्रियांच्या आरोग्यविषयक सर्व बाबींवर तसेच किती मुले व्हावीत हे ठरविण्याचा अधिकार या धोरणाने महिलांना दिला. स्त्री–पुरुष यांना आरोग्यविषयक समान सुविधा पुरविण्याचा तसेच स्त्रियांना लैंगिक व मानसिक आरोग्याकडे अधिक लक्ष देणाऱ्या कार्यक्रमाचा समावेश या धोरणात केला गेला.

**बालमृत्यू व माता मृत्यूचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न –**

महिलांविषयक धोरणात महाराष्ट्रातील बाळ व मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्याकडे लक्ष देण्याचा निर्णय घेतला गेला. सर्व आदिवासी उपाययोजना क्षेत्रांमधील प्रत्येक गावांमध्ये सुरक्षित प्रसुतिसेवा उपलब्ध करून देण्यासाठी पारंपरिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय या धोरणात घेतला गेला. वयात येणाऱ्या मुलींचे शारीरिक व मानसिक आरोग्यासंदर्भात शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**पोषणआहार हा मूलभूत आरोग्याचा पाया –**

स्त्रियांना नेहमी पुरेसा पोषण आहार दिला जावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा निर्णय या धोरणात घेतला गेला. कारण पोषण आहार मिळणे हा स्त्रीच्या एकूण विकासाशी संबंधित व महत्त्वाची बाब मानली गेली.

**समारोप –**

शरद पवारांनी जून १९९४ मध्ये स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्याकडून देशाच्या समृद्धीसाठी समाज परिवर्तनवादी व क्रांतिकारी महिलांविषयक धोरण जाहीर करून आपल्या दूरदृष्टीची जाणीव देशाला करून दिली. देशात सर्वप्रथम महिलांना राजकीय, आर्थिक, व सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. स्त्री व पुरुष हा भेद दूर करण्याचा, समानता आणण्याचा व स्त्रियांना आर्थिक सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न करणे इत्यादी बाबी हे धोरण अमलात आणल्याने झाला असे म्हणता येईल. निरनिराळ्या क्षेत्रांत कर्तृत्वाची झलक महिला दाखवू शकतील, स्वतःची प्रगती करू शकतील,त्यांच्यात सामर्थ्य येईल व त्या सबल होतील असे दूरदर्शीपणाचे धोरण शरद पवार यांनी राबविले. त्यामुळे स्त्रियांना महाराष्ट्रात प्रथम स्वायत्त व स्वतंत्र दर्जा मिळविण्यास मोठी मदत झाली. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी उचललेले हे पहिले क्रांतिकारी पाऊल होते.

**संदर्भ साधने :**


१. अँड. कांडगे राम, लोकनेते शरद पवार, राजश्री प्रकाशन, पुणे.
२. शरद पवार, लोक माझे संगती, राजहंस प्रकाशन, पुणे.
३. टाकले हेमंत, काटेवाडी ते नवी दिल्ली, अविष्कार प्रकाशन.
४. शेवते अरुण, आम्ही पाहिलेले शरद पवार, ऋतूरंग प्रकाशन.
५. शरद पवार, स्पर्धा कळशी, रोहन प्रकाशन.